# **Possitive Stories**

गडचिरोली दिनांक ०५/०६/२०१७

## *गुरेकसा जंगल परीसरात पोलीस नक्षल चकमक*

गोपनिय माहितीच्या आधारे उपविभाग धानोरा अंतर्गत पोमके मुरुमगाव हद्दितील मौजा गुरेकसा जंगल परीसरात मुरुमगाव पोस्ट पार्टी व सिआरपीएफ संयुक्तपणे नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना काल दिनांक ०४/०६/२०१७ रोजी दुपारी ०४.३० वा. च्या दरम्यान पोलीस नक्षल चकमक उडाली. पोलीसांनी आत्मसंरक्षणार्थ प्रत्युत्तरादाखल नक्षल्यांच्या दिशेने गोळीबार केला. पोलीसांचा वाढता दबाव पाहून नक्षलवादी जंगलाचा फायदा घेवून पळून गेले.

सदर जंगल परिसरात चकमकीनंतर नक्षलविरोधी शोधमोहिम तीव्र करण्यात आली आहे.